## ॥ बाबा ॥

## नैवेद्य (लाडू)

लाडू घ्या हो गणूदेवा । माझे शिव वांगणेश्वरा
भक्तीच्या शुध्द तुपात, भाजुनी वासनांचा रवा
बाबा नाम वेलदोडे, काजू बेदाणा सुका मेवा
चिंतनात सतत देवा, झाला प्रेमाचा हो मेवा ॥ 1 ॥

देहबुध्दी साखर पाक, रवा मिसळुनी नीट
श्रद्धा निष्ठा दोन्ही कर, लाडू वळती झटपट
दर्शनी केव्हा येईन मंदिरी, घेऊन लाडवाचे ताट ॥ 2 ॥

वेगेवेगे येऊनी सत्वर, मुखी घालूनी कणभर
हर्षले मन फार, देखूनी दृष्य ते अपार
वा ! सुरेख सर्टिफिकेट, झाला प्रसादाचा थाट ॥ 3 ॥

अज्ञ आम्ही भक्तगण, सारी तुमचीच शिकवण
स्मरण असता वांगणेश्वरा नाही काहीच कठीण
भोळ्या भक्तीचा हा मेवा, स्विकारावा महादेवा ॥ 4 ॥

आज्ञा होता परमात्म्याची, धाऊनी आले वांगणीत
लाडू गडू घेऊनी ऐटीत, बैसले आसनी निवांत
मार्गी लाऊन भोळे भक्त, दाविली जीवनाची वाट ॥ 5 ॥

उणीव नाही गोकुळात, झाली सा-यांची भरभराट
तृप्त झाले गोकुळवासी, घेऊनी बाबा दर्शनास

शरण चरणी बाबा देवा, ह्रदयी अनमोल ठेवा ॥ 6 ॥